# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि.  पहिली खबर क्र. FIR No.: 35  वर्ष Year: 2025  दिनांक Date: 12/11/2025

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधि. 1988  कलमे Sections: 7, 7(A), 12
   (ii) अधिनियम Act ........ कलमे Sections ........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ........

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: शुक्रवार  तारीख पासून Date from: 12/09/25  वेळ Time: -  तारीख पर्यंत Date to: 12/11/25  वेळ Time: 19:55

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: दि. 10/11/2025  वेळ Time: 16:00 वाजता

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: 01/25  तारीख Date: दि. 12/11/2025  वेळ Time: 01:00

4. माहितीचा प्रकार Type of Information ........ लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........ चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ........

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: दादा स्वारखबल प्रा. लि. गिरीवन विकास, चेंबूर  ठिकाणाचे नंबर No. if any ........ गल्ली Ward ........ रस्त्याचे नाव Name of road: 57 (O.R.).

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: डॉ. के. संघु मार्ग,  गाव Village ........ पोस्ट Post: चेंबूर (E), मुंबई.  तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ........ तालुका Taluka ........ जिल्हा Dist. ........ राज्य State ........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. प्रविण नांदकर  (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: तानाजी नांदकर

(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 41 वर्षे  (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: 9881736353

(e) पारपत्र क्रमांक Passport No. ........ दिल्याचा दिनांक Date of issue ........ दिल्याचे ठिकाण Place of Issue ........ (f) व्यवसाय Occupation ........

(g) धर्म Religion: हिंदू  जात Caste: -  जनजात Sub-Caste: -

(h) पत्ता Address ........ गल्ली/सर्व्हे नं. Ward ........ घर/नाव नं. House Name No. ........ फोन/मो. नं. Phone No. ........ पॅन नं. Pan No. ........ वोटर्स नं. Card No. ........

रस्त्याचे नाव Road ........ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place: लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,  गाव Village: सरपोचखानवाला  पोस्ट Post: रोड,  पो. स्टे. P. Stn. ........

तालुका Taluka ........ जिल्हा Dist.: वरळी, मुंबई  राज्य State ........ सध्याचा पत्ता Present Address ........

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

① श्री. चंद्रकांत हनुमंत वासुदेव, लिपीक टंकलेखक, दिवाणी सत्र न्यायालय, माझगाव.
② श्री. राजारूद्दीन रा. काझी, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. 14, माझगाव, मुंबई.

फिर्याद

दिनांक १२/११/२०२५

मी, प्रविण तानाजी नावडकर, वय ४१ वर्षे, धंदा : नोकरी (सहाय्यक पोलीस आयुक्त),नेमणुक- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, मुंबई, मो.क्र. ९८८१७३६३५३.

------

मी वरील प्रमाणे असून, दिनांक ३१/१०/२०२४ रोजीपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे 'सहाय्यक पोलीस आयुक्त' या पदावर नेमणूकीस आहे.

मी दिनांक १०/११/२०२५ रोजी कर्तव्यावर असताना, मला व पो.नि. सुनिता दिघे यांना मा. अपर पोलीस आयुक्त, ला.प्र.वि. मुंबई यांनी पडताळणी कारवाई क्र. ७८/२०२५ मध्ये पुढील कारवाईकरीता माझी पर्यवेक्षक अधिकारी व पो.नि. दिघे यांची तपासी अधिकारी म्हणुन लेखी आदेश केल्याने नमुद पडताळणी मधील तक्रारदार श्री. सुनिल रामाचंद्रन नायर, वय ५३ वर्षे यांचेकडे त्यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चर्चा केली, त्यांनी त्यांच्या स्व:हस्ताक्षरात इंग्रजी भाषेमध्ये तक्रार अर्ज लिहून तो अर्ज आम्हास वाचण्यास दिला. त्यांच्या तक्रारीची हकीकत अशी की,

''तक्रारदार श्री. सुनिल रामचंद्रन नायर वय ५३ वर्षे, धंदा - व्यवसाय, पत्ता:- रूम नं २, तळमजला, हेलन हेवन बिल्डींग, सेंट सिरिल रेड, बांन्द्रा (वेस्ट) मुंबई यांचा शेअर ट्रेडींगचा व्यवसाय असुन सदर व्यवसाय हा ते त्यांची कंपनी 'सेंटारस डेटा ॲनॉलिस्ट प्रा.लि,अंधेरी' मार्फत करतात.

तक्रारदार यांची पत्नी श्रीमती लोरेन नायर यांची 'असेट इनव्हेस्टमेंट सर्व्हिसेस लि.' ही भागीदारी कंपनी असुन सदर कपंनीची '६०९, कोहिनुर सिटी मॉल, कीरोल रोड, कुर्ला (वेस्ट) मुंबई' ही मालकीची जागा आहे. सदरची जागा ही व्यक्ती नामे श्री.सुखविंदर सिंग गिल व श्री.कनवर तुर यांनी बळजबरीने घेतल्याने त्याचे विरोधात तक्रारदार व त्यांच्या पत्नीने सन २०१५ मध्ये उच्च न्यायालय, मुंबई येथे सिव्हील सुट क्र ७१५/२०१५ दाखल केली होती. दि.२७/०४/२०१६ रोजी उच्च न्यायालयाने नमुद जागेच्या थर्ड पार्टी राईटस निर्माण करण्यास स्थगिती दिली आहे. उच्च न्यायालयाने ज्या केसेस या रु. १० कोटी पेक्षा कमी किंमतीच्या आहेत त्या सर्व केसेस दिवाणी सत्र न्यायालय येथे वर्ग केल्या आहेत व त्यामध्ये मार्च २०२४ मध्ये तक्रारदार यांची नमुद केस उच्च न्यायालयाने दिवाणी सत्र न्यायालय, माझगाव मुंबई येथे वर्ग केली व त्याचा कर्मशियल सूट नं. 100974/2024 असा आहे. सदर न्यायालयात केस चालवण्यासाठी तक्रारदार यांनी वकील श्री. घाडीगावकर यांना नेमले आहे.

नमुद केसच्या सुनावणीकरीता तक्रारदार हे स्वत: किंवा त्यांना शक्य नसल्यास त्यांचे ऑफीसमधील सहकारी श्री. सुरेश दुतोंडकर हे हजर रहात असत. सुनावणी दरम्यानच्या काळात दि.०९/०९/२०२५ रोजी तक्रारदार यांचे सहकारी श्री. सुरेश दुतोंडकर यांनी त्यांना दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगाव येथील कोर्टात काम करणारे टायपिस्ट लोकसेवक श्री.वासुदेव यांनी त्याचा मोबाईल कमांक ९७६९५४९५९२ दिला असुन, त्यांना फोन करायला सांगितले आहे असे तक्रारदार यांस सांगितले. त्याप्रमाणे तक्रारादार यांनी लोकसेवक श्री. वासुदेव यांस फोन केला असता, त्यांच्या म्हणण्याप्रमाणे ते त्यास दि.१२/०९/२०२५ रोजी स्टारबक्स कॅफे, चेबुर मुंबई येथे भेटले. त्यावेळी लोकसेवक श्री. वासुदेव यांनी तक्रारदार यांना त्यांच्या बाजूने केसचा निकाल देण्याच्या ऑर्डर करिता त्यांच्याकडे रूपये २५ लाखाची लाचेची मागणी केली व त्यामधील १० लाख हे लोकसेवक यांचेकरिता व १५ लाख हे जज करिता असे सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी त्यास एवढी रक्कम देण्यास नकार दिला.त्यावेळी लोकसेवक श्री. वासुदेव यांनी तक्रारदार यांना विचार करून सांगा असे सांगितले. त्यानंतर लोकसेवक श्री. वासूदेव यांचे सांगण्यावरून तक्रारदार यांनी चेंबूर ते उरण अशी उबेर टॅक्सी मोबाईलवरुन बुक करून त्याचे पेमेंट तक्रारदार यांनी केले आहे.

त्यानंतर दि.१३/०९/२०२५ रोजी लोकसेवक श्री.वासुदेव यांनी तक्रारदार यांना व्हॉटसअप कॉल करून ''१५ लाख फायनल है उरण मे लाके देने का।'' असे सांगितले. त्यावेळेस देखील तक्रारदार यांनी त्यांना एवढी रक्कम देण्यास नकार दिला. त्यानंतर दि.०८/११/२०२५ रोजी तक्रारदार यांचे ऑफिसमधील सहकारी श्री.सुरेश दुतोंडकर यास लोकसेवक श्री.वासुदेव याने फोन करून पुन्हा पैशाबदल विचारणा करू लागला व

त्याने तक्रारदार यांना त्यांस कॉल करण्याबाबत कळविले. तसेच त्यावेळी लोकसेवक श्री. वासुदेव याने श्री. सुरेश यांस १५ लाख रूपये दिले नाही तर केस ही तक्रारदार यांचे विरोधात जाईल असे बोलला.

तक्रारदार यांचे लोकसेवक श्री. वासुदेव यांचे सोबत कोणतेही आर्थिक व्यवहार किंवा पुर्ववैमनस्य नाही मात्र लोकसेवक श्री. वासुदेव हे तक्रारदार यांच्या केसची ऑर्डर त्यांच्या बाजुने करण्याकरिता रूपये १५ लाख लाचेची मागणी करीत आहेत व तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, तक्रारदार हे त्यांचे सहकारी श्री. सुरेश दुर्तोंडकर यांच्यासह दिनांक १०/११/२०२५ रोजी लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग येथे समक्ष हजर होवून दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र १४, माझगाव मुंबई येथील टायपीस्ट लोकसेवक श्री. वासुदेव हे लाच मागणी करत असल्याबाबत स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज दिला.''

तक्रारदार यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने पुढील कारवाईकरीता शासकीय पंचांची आवश्यकता असल्याने प्रभारी अंमलदार पो.ह. दिनेश कावले यांच्यामार्फतीने दोन शासकीय पंच नामे १) श्री. विकास संपत लोहकरे, वय ३३ वर्षे, व्यवसाय - नोकरी, (मोटार वाहन निरीक्षक), कार्यालयाचा पत्ता : प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई पूर्व, बी-२, तिसरा मजला, वडाळा ट्रक टर्मिनल, वडाळा, मुंबई , रा.ठी. : फ्लॅट क्र. ११०७, हायलॅन्ड पर्ल, नारायणा स्कूलसमोर, ढोकाळी, ठाणे (पश्चिम), जि.ठाणे, २) श्रीमती काजल अशोक सोनवणे, वय २८ वर्षे, व्यवसाय - नोकरी, (लिपिक टंकलेखक), कार्यालयाचा पत्ता : कामगार आयुक्तालय, कामगार भवन, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकूल, वांद्रे (पूर्व), मुंबई, रा.ठी. : रूम नं. ८०४, आठवा मजला, आकृती बिल्डींग नं. १, नोबेल केमिस्टजवळ, शास्त्री नगर, वांद्रे (पूर्व), मुंबई यांना पाचारण केले. दोन्ही पंच कार्यालयात हजर झाल्यानंतर त्यांना तक्रारदार यांची प्रथम ओळख करुन दिली. तसेच त्यांच्या तक्रारीविषयी थोडक्यात हकिगत सांगून, तक्रारदार यांचा स्व:हस्तलिखित तक्रार अर्ज पंचास वाचण्यास दिला. पंचांचा तक्रार अर्ज वाचून झाल्यानंतर त्यावर समक्ष म्हणून पो.नि. सुनिता दिघे यांनी व पर्यवेक्षण अधिकारी म्हणुन मी , तक्रारदार यांचा सहकारी श्री सुरेश तसेच दोन्ही पंचानी स्वाक्षरी करून पो.नि. दिघे यांनी सदरचा अर्ज त्यांचे ताब्यात घेतला.

तद्नंतर पो.नि. दिघे यांनी पंचासमक्ष सांगितले की, तक्रारदार हे लोकसेवकाची प्रत्यक्ष भेट घेण्याआधी त्यांना त्यांचे मोबाईल फोनवर व्हॉट्सअप कॉल करून भेटीचे वेळ व ठिकाण याबाबत विचारणा करणार आहेत. त्यानुसार आम्ही व दोन्ही पंच व तक्रारदार असे लाप्रवि कार्यालयातील तांत्रिक कक्षात गेलो. सदरवेळी तांत्रिक कक्षातील पो.ह. मठपती यांच्या मदतीने तक्रारदार व दोन्ही पंचांना व्हॉईस रेकॉर्डर ची माहिती देवून पडताळणी दरम्यान घ्यावयाच्या दक्षताबाबत सुचना देवून तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर सूरु करुन पो.नि. दिघे, तक्रारदार व दोन्ही पंच यांचे प्रथम वक्तव्य ध्वनिमुद्रीत करण्यात आले. तद्नंतर तक्रारदार हे लोकसेवक वासुदेव यांस मोबाईलवर संपर्क करणार असल्याने पो.ह. मठपती यांचेमार्फतीने व्हॉईस रेकॉर्डर चालू करून तक्रारदार यांनी त्यांचे मोबाईल नं. ९७०२६६६०६६ यावरून स्पीकर ऑन करुन लोकसेवक श्री. वासुदेव यांस त्यांचे मोबाईल नं. ९७६९५४९५९२ यावर व्हॉट्स अप कॉल करून ध्वनिमुद्रीत करण्यात आला. नमुद संभाषणामध्ये तक्रारदार यांनी ' **हा, वासुदेव सर... अच्छा कभी अपना नेक्स डेट ...**' अशी विचारणा केली असता, लोकसेवक श्री. वासुदेव यांनी ''**अभी यही विक में है शायद से ...**'' असे उत्तर दिले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास 'तो कैसे करेंगे सर ...' असे विचारले असता, लोकसेवक यांनी ''**आप बोलो, आप तो बोले थे मे करके जाता हूँ, फिर आप बोले मे दिवाली के बाद आता हूँ, मगर कोई आया हि नही कुछ नही।**'' असे बोलले. त्यावर तक्रारदार यांनी ''**हा तो आप थोडा जादा बोले थे ना इसके लिये, कुछ।**'' असे म्हटल्यावर लोकसेवक यांनी ''**आपने तो बोला था फायनल पंधरा में बोला था....**'' असे म्हटले. तेव्हा तक्रारदार यांनी '' **पंधरा लाख।** '' अशी विचारणा केली असता, त्यावर लोकसेवकाने '' **हूँ** '' असे बोलून '' **अॅक्च्युली, उसमे साहब को, मेरे को तो कुछ मिलने का ही नही, आपके हिसाब से कुछ देना है तो देदो आप, ठिक है।**'' असे तक्रारदार यांना सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास कधी भेटायचे असे बोलणे केले असता, लोकसेवक यांनी उद्या असे सांगितले. त्यावर तक्रारदार यांनी लोकसेवकास कोठे भेटायचे याबाबत विचारले असता, लोकसेवक यांनी '' **अं, वैसे हि में, जहा वैसे आया था वहा, के मेरे को एक ओला करके दे दो।**'' असे म्हटले, त्यावर तक्रारदार यांनी ' **अच्छा, वो अपना स्टारबक्स चेंबुर।**' असे बोलले.

Sunitadighe
12/11/25

वरील तक्रारदार व लोकसेवक यांचे मोबाईलवरील झालेल्या ध्वनिमुद्रीत संभाषणावरून लोकसेवक श्री. वासुदेव हे तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. लोकसेवक यांनी मागणी केलेली लाचेची रक्कम ही दिनांक ११/११/२०२५ रोजी चेंबूर येथील स्टारबक्स कॅफे याठिकाणी घेवुन येण्यास सांगितले. त्यामुळे पुढील सापळा कारवाई ही दिनांक ११/११/२०२५ रोजी करण्याचे ठरले.

दिनांक ११/११/२०२५ रोजी तक्रारदार, पंच व पोलीस पथक असे ला.प्र.वि. मुंबई कार्यालयात आल्यानंतर मी व पो.नि. दिघे यांनी दोन्ही पंच, तक्रारदार यांना सापळा कारवाई दरम्यान घ्यावयाच्या दक्षता व करावयाची कारवाईबाबत सुचना दिल्या. तद्नंतर पो.नि. दिघे यांनी तक्रारदार यांना लाचेच्या रक्कमेबाबत विचारणा केली असता, तक्रारदार यांनी त्यांचेकडील बचतीतील रूपये चार लाख इतकीच रक्कम घेवुन आल्याचे सांगितले. त्यामुळे पो.नि. दिघे यांनी स.पो.आ. प्रशासन यांचे कार्यालयातून उर्वरित ११ लाख रक्कमेच्या ५०० दराच्या २२०० खेळण्यातील नोटा उपलब्ध केल्या. त्यानंतर पो.नि. दिघे यांचे सुचनेप्रमाणे पथकातील अंमलदार स.फौ. पोळ यांचेमार्फतीने तक्रारदार यांचेकडील उपलब्ध लाचेची रक्कम रू. ४,००,०००/- (त्यामध्ये रू. ५००/- दराच्या भारतीय चलनाच्या ८०० नोटा) यांच्या झेरॉक्स काढण्यात आल्या. त्यानंतर प्रभारी अंमलदार पो.ह. नागेश शेमडकर यांनी पंच व तक्रारदार यांना अॅथ्रोसिन पावडरचे गूणधर्म समजावून सांगितले. पो.ह. शेमडकर याचेमार्फतीने लाच म्हणून वापरण्यात येणाऱ्या रू.४,००,०००/- नोटा व खेळण्यातील रू. ११,००,०००/- नोटा असे एकुण १५ लाख लाचेची रक्कम एकत्रित करून नमुद रक्कमेस अॅथ्रोसिन पावडर लावून ती लाचेची रक्कम एकत्रित करून पिस्ता रंगाच्या मोठया लिफाफ्यात ठेवुन सदर लिफाफ्यासदेखील बाहेरून अॅथ्रोसिन पावडर लावून तो लिफाफा तक्रारदार यांच्या सॅगमध्ये ठेवली. त्यानंतर पो.नि. दिघे यांनी पोह. शेमडकर हे सापळा कारवाईमध्ये भाग घेणार नसल्याचे सांगितले.

दिनांक ११/११/२०२५ रोजी चेंबूर, मुंबई येथील स्टारबक्स कॅफे येथे सापळा कारवाईचे आयोजन केले. त्यावेळेस पोलीस पथक स्टारबक्स कॅफे या ठिकाणी सापळा रचून थांबलेले होते. तक्रारदार हे स्टारबस्क कॅफे येथे गेले असता, त्यांच्या पाठोपाठ पंच क्र. १ श्री. लोहकरे व महिला पो.ह. पाटील हे गेले. तक्रारदार हे स्टार बक्स कॅफेतील वरच्या मजल्यावर बसले असता, पंच क्र.१ श्री. लोहकरे व मपोह पाटील हे तक्रारदार यांचे समोर काही अंतरावर दिसेल अशा रितीने बसले. थोडयावेळाने लोकसेवक श्री. वासुदेव हे स्टारबक्स कॅफे मध्ये येवून तक्रारदार यांच्या टेबलजवळ बसून बोलणे सुरू झाले. काही वेळानंतर तक्रारदार यांनी त्यांचे डोळयावर चष्मा लावून लोकसेवकाने लाच स्विकारलेबाबत पूर्वनियोति इशारा दिला. त्यानंतर लोकसेवक वासुदेव हे उठून कॅफेमधून वरच्या मजल्यावरून पायऱ्या उतरून खाली येत असताना, पो.नि. दिघे व सापळा पथकाने लागलीच पंचांसह लोकसेवक श्री. वासुदेव यांना १९:५१ वा लाचेच्या रक्कमेसह रंगेहात पकडले. सदर लोकसेवकास त्याचे नाव व पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव चंद्रकांत हणमंत वासुदेव, वय ४० वर्षे, धंदा नोकरी पद - लिपीक टंकलेखक (नेमणुक : दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगाव, मुंबई), राठी : मातोश्री सदन, ओमकार कॉलनी, कुंभारवाडा, उरण, नवी मुंबई ४००७०२ असे सांगितले. त्याकडे लाचेच्या रक्कमेबाबत अधिक चौकशी केली असता, आरोपी लोकसेवक श्री. चंद्रकांत वासुदेव यांनी सदर लाचेची रक्कम ही श्री. काझी, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट १४, माझगाव, मुंबई यांचेकरीता त्यांचे सांगण्यावरून घेतली असल्याचे सांगितले. सदर बाबीची खात्री करण्यासाठी ताब्यात घेतलेला लोकसेवक यांनी अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. काझी यांना त्यांचे मोबाईल क्रमांक ९८३३३७०६२३ यावर स्वत:च्या इच्छेने पंचांसमक्ष त्यांचा मोबाईल नं. ९७६९५४९५९२ यावरून व्हॉट्सअप कॉल करून, त्यांना 'घाडीगावकरचे मॅटर आहे त्यामध्ये पंधरा लाख दिलेले आहेत, उद्या सकाळी आणून देवू का?' असे बोलल्यावर अतिरिक्त सत्र न्यायाधिश श्री. काझी यांनी ' बर हो ' म्हणून आठ वाजता त्यांच्या राहत्या घरी बोलाविले.

तरी आरोपी लोकसेवक क्र.१) श्री. चंद्रकांत हणमंत वासुदेव, लिपीक टंकलेखक, दिवाणी सत्र न्यायालय, माझगाव, मुंबई यांनी आरोपी लोकसेवक क्र. २) श्री.राजाउद्दीन स. काझी, अतिरिक्त सत्र न्यायाधिश, दिवाणी सत्र न्यायालय, कोर्ट क्र. १४, माझगाव, मुंबई यांच्या सांगण्यावरून त्यांचेकरीता व स्वत: करीता तक्रारदार नामे श्री. सुनिल रामाचंद्रन नायर यांचेकडे त्यांचे कर्मशिअल सूट नं. 100974/2024 या प्रकरणामध्ये तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देणेकरीता रू. २५,००,०००/- इतकी लाचेची मागणी करून तडजोडीअंती आलोसे क्र.१ यांनी रू.१५,००,०००/-स्विकारण्याचे मान्य केले. दिनांक ११/११/२०२५ रोजी

सापळा कारवाईदरम्यान आलोसे क्र. १ यांनी आलोसे क्र. २ यांचे सांगण्यावरुन त्यांचेकरीता रु. १५,००,०००/- इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचांसमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडले, म्हणुन माझी आलोसे क्र. १ व २ यांच्या विरोधात भ्रष्टचार प्रतिबंध अधिनियम १९८८ चे कलम ७, ७ (अ),१२ अन्वये फिर्याद आहे.

माझा जबाब संगणकावर मराठित टंकलिखीत केला असुन, तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

समक्ष,

(सुनिता दिघे)

पोलीस निरीक्षक,

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई.

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... विना विलंब

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील ( आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा ) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

नाही.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ......

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ...... –

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा ) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील वर नमूद तारीख वेळी व ठिकाणी पोलीस कॉन्स्टेबल क्र. ?? महेश आलोसे क्र.01 यांनी आलोसे क्र.02 यांच्या सांगण्यावरून त्यांचेकरीता व स्वतःकरीता तक्रारदार नामे श्री. सुनिल नायर यांचेकडे त्यांचे कम्प्लेंट ... नं. 100974/2024 या प्रकरणामध्ये तक्रारदार यांच्या बाजूने निकाल देणेकरीता रु.25,000,00/- इतकी लाचेची मागणी करून तडजोडी अंती आलोसे क्र.01 यांनी आलोसे क्र.02 यांचे सांगण्यावरून त्यांचेकरीता रु.15000/- इतकी लाचेची रक्कम तक्रारदार यांचेकडून पंचासमक्ष स्विकारताना रंगेहाथ पकडले म्हणून कलम 7, 7(A), 12(?) भ्र.प्र. अधि. अन्वये गुन्हा नोंद

13. **केलेली कार्यवाही** –1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ......

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank .............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ......

(3) Transferred to P. S. ......
District ...... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station

संपूर्ण नाव Name ...... सुनिता दिघे
पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक
तपासिक अ. चा कोड क्र. ......
Posting ला. प्र. वि. मुंबई
Code No. of I. O. ......

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत | 2 फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of First Information Report

जबाब.

फिर्यादी नामे प्रतिभा तानाजी नावडकर, वय-41 वर्षे, धंदा-नोकरी (सहा. पोलिस आयुक्त) नेमणूक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

समक्ष,

Sunitadighe
(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई.